नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०१/२०२६ (रविवार)

फसवणुक करून दागिने पळविणाऱ्या अज्ञात आरोपीतांना २४ तासाच्या आत केली अटक, १ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त
बेला पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांची संयुक्त कारवाई

पोलीस स्टेशन बेला :— दिनांक ०३/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी उषा केशव नेवारे, रा. टेंबरी यांनी तक्रार दिली की, **दिनांक ३१/१२/२५ रोजी त्यांचे घरी तीन अज्ञात इसम भिक्षा मागणे कामी आले . त्यांनी फिर्यादीला आणि फिर्यादीच्या मुलीला तुमच्या घरावर मोठे संकट येणार आहे, संकटापासून वाचण्याकरिता तुमच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून दया , दागिने उद्या परत आणून देतो असे कारण सांगून फिर्यादी आणि तिच्या मुलीचे ताब्यातील दोन मंगळसुत्र, बिरी आणि झुमके असे दागिने पळवुन नेले.** सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बेला येथे कलम ३१८, ३१८(१), ३१८(५), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास बेला पोलीस करीत असतांना , स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला. दिनांक ०३/०१/२०२६ रोजी बेला पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरित्या तांत्रिक पध्दतीने तपास करून सदर गुन्हयातील आरोपी **१) विजय सोजीराम वाघ, वय २६ वर्ष ,२) राजु पिसाराम गुजर, वय २९ वर्ष, ३) दिपक तुलसीराम यादनेकर, वय ५८ वर्ष, सर्व रा. सेलु ता कळमेश्वर जि नागपुर** यांना निष्पन्न केले. अवघ्या **२४ तासाच्या आत सर्व आरोपीतांना सेलु येथुन ताब्यात घेवुन** त्याचे ताब्यातुन चोरीस गेलेला **संपुर्ण मुद्देमाल** दागीने किंमती १,१०,०००/— रूपये आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन २) हिरो स्प्लेन्डर प्लस मो सा क्र एमएच ४० सीजी १८४० किंमती ७०,०००/— रूपये

असा एकुण १,८०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीस पोलीसांनी अटक केली असुन आरोपीतांचा न्यायालयीन कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात येत आहे 'रेझिंग डे' सप्ताह

२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, **दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.** आज दिनांक ०४/०१/२०२६ रोजी नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे रेझिंग डे' निमित्य विविध उपक्रम घेण्यात आले आहे.

पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत बसस्टॉप मौदा येथे तसेच पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत तारसा चौक येथे महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त (रेझिंग डे) नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन नागरिकांना पोलीस दलाच्या विविध विभागांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने साजरे होत आहे. या प्रदर्शनात पोलीस बँड पथकाने आकर्षक वादन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत रामटेक शहर येथे रेझिंग डे निमित्य सर्व ऑटो चालक मालक यांना पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत अरोली येथे नागरिकांना वाहतुक नियम, रस्ते सुरक्षा बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

श्रीराम
कृषी सेवा केंद्र
श्रीराम ट्रेडर्स
मातोश्री
डेअरी अँन्ड आईसक्रीम सेंटर

अध्यक्ष - न.प.कन्हान पिपरी
मा.श्री
राजेंद्र शेंदरे
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा
पोलीस ठाणे कन्हान
महाराष्ट्र
स्थापना दिवस

झेरॉक्स
श्रीराम
कृषी सेवा केंद्र
श्रीराम ट्रेडर्स
मातोश्री
डेअरी अँड आईस्क्रीम सेंटर
पान पॅलेस

RUDRA NX

अवैधरित्या विनापरवाना जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

दिनांक ०३/०१/२०२६ रोजी **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत मौजा पटेल नगर पिपरी कन्हान येथे १) क्रिष्णा शिवाजी भालेकर, वय ३२ वर्ष, रा.पटेल नगर, कन्हान,२) हितेश हिरालालजी साठवणे, वय ३२ वर्ष, रा. राधाकृष्ण नगर, कन्हान हे सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर कारवाई करून नगदी १,२५५ /— रूपये सट्टापटटीचे साहीत्य आणि इतर साहीत्य एकुण १,६१० /रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत मौजा सोनेघाट शिवार १)संदीप मारोतराव धारणे, वय ३२ वर्षे, रा. सराखा बोर्डा २) रोशन गोमाजी नारनवरे, वय २३ वर्षे रा. बोरडा ३)प्रदिप भगवान उईके, २१ वर्षे रा. सोनेघाट ४)आर्यन बबलु मडावी, वय २० वर्षे रा. सोनेघाट ५)अशोक बाळकृष्ण उईके, वय ३५ वर्षे, रा. सोनेघाट ६) नितेश वासुदेव उईके, वय ३२ वर्षे, रा. सोनेघाट

७)सचिन काशीराम मडावी, वय ३३ वर्षे, रा. सोनेघाट, ता. रामटेक हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांकडुन ५२ तासपत्ते आणि नगदी असा एकूण २,२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.दोन्ही कारवाईत एकुण **३,८९०/—** रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने